आरोग्य सेवक (पुरुष) वर्ग ३ यांना
आरोग्य सहाय्यक (पुरुष) वर्ग ३ यापदावर
पदोन्नतीने पदस्थापना देणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र. आरोग्य/कार्या २/आस्था-३/ ६४२ /२०२५
दिनांक २२/०८/२०२५

वाचा :- १) महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील परिशिष्ट ४
२) महाराष्ट्र ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.एपीटी/१०९१/प्रक्र १०९/१३ दिनांक २१ मार्च, १९९१
३) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे शासन निर्णय क्र.एपीटी/१००१/ प्र.क्र.९६०/आस्था८ दिनांक ०४ सप्टेंबर २००३
४) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक एस आर व्ही — २०१५/प्र.क्र.३१०/कार्या १२ दिनांक १५ डिसेंबर २०१७
५) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील पत्र क्रमांक बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२-अ/कार्या १६, ब दिनांक २९ डिसेंबर २०१७
६) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रं. एस आर व्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२, दिनांक ०१ ऑगस्ट, २०१९
७) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील पत्र क्रमांक बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/ १६-ब दिनांक ०७ मे, २०२१
८) पदोन्नती निवड समिती बैठक दिनांक- १७/०४/२०२५ मधील मंजुर इतिवृत्त
९) दिनांक-१८/०८/२०२५ रोजीचे समुपदेशनाचे इतिवृत्त

जिल्हा परिषद अंतर्गत आरोग्य सेवक (पुरुष) वर्ग ३ या पदावर कार्यरत असणा-या कर्मचा-यांस आरोग्य सहाय्यक पुरुष वर्ग ३ पदी सातव्या वेतन आयोगा नुसार वेतन स्तर एस-१० रुपये २९२००-९२३०० या मध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटींच्या अधिन राहुन रकाना क्रमांक ५ मध्ये नमुद केलेल्या ठिकाणी त्यांना सेवा जेष्ठतेनुसार पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव | कर्यरत ठिकाण, उपकेंद्र, प्रा.आ.केंद्र व तालुका | पदोन्नतीचा प्रवर्ग | पदोन्नतीने पदस्थापना दिलेले प्रा.आ.केंद्र,/तालुका |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री.तेलोरे आशोक मुरलीधर | उपकेंद्र-, प्रा.आ.केंद्र-शिरसगांव, ता.नेवासा | सेवा ज्येष्ठतेनुसार | टाकळी काझी, ता.अहिल्यानगर |
| २ | श्री.सुतार योगेश भानुदास | उपकेंद्र-खांडगांव, प्रा.आ.केंद्र-कोळगांव, ता.श्रीगोंदा | सेवा ज्येष्ठतेनुसार | निघोज, ता.पारनेर |
| ३ | श्री.गंगावणे रावसाहेब पांडुरंग | उपकेंद्र-दुरगांव, प्रा.आ.केंद्र-कुळधरण, ता.कर्जत | सेवा ज्येष्ठतेनुसार | आढळगांव, ता.श्रीगोंदा |
| ४ | श्री.मिसाळ अभिजीत बन्सी | उपकेंद्र-खेतेवाडी, प्रा.आ.केंद्र-कोहणे, ता.अकोले | सेवा ज्येष्ठतेनुसार | देवठाण, ता.अकोले |
| ५ | श्री.वाघमारे जयकुमार पोपटराव | उपकेंद्र-निंभ्रळ, प्रा.आ.केंद्र-म्हाळादेवी, ता.अकोले | सेवा ज्येष्ठतेनुसार | देवठाण, ता.अकोले |
| ६ | श्री.थोरात तेजेश भगवान | उपकेंद्र-जवखेड, प्रा.आ.केंद्र-मिरी, ता.पाथर्डी | सेवा ज्येष्ठतेनुसार | निमोण, ता.संगमनेर |
| ७ | श्री.नवगिरे शिमोण पदमाकर | उपकेंद्र-प्रतापपुर, प्रा.आ.केंद्र-निमगांव जाळी, ता.संगमनेर | सेवा ज्येष्ठतेनुसार | चंदनापुर, ता.संगमनेर |

१. सदरची पदोन्नती ही मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७/२०१५ मध्ये दिनांक ०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णया विरोधात राज्य शासनाने मा.सवोच्च न्यायालयात दाखल केलेल्या व प्रलंबित असलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ वरील मा.सवोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरती स्वरुपात खुल्या प्रवर्गात रिक्त असलेल्या पदावर ज्येष्ठतेने देणेत येत आहे.

२. सदरची पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपाची असल्यामुळे पदोन्नतीच्या दिनांका पासुन सेवा जेष्ठतेचा हक्क सांगता येणार नाही.

३. सदरची पदोन्नती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची राहील व वरिष्ठ संवर्गात ज्येष्ठते करिता ती ग्राहय धरता येणार नाही. त्या संवर्गात वेतना व्यतिरीक्त अन्य कोणतेही लाभ त्यांना मिळणार नाही.

४. पदोन्नतीचे ठिकाण कोणत्याही परिस्थितीत बदलुन दिले जानार नाही याबाबत कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.

५. सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

६. सदर आदेशाच्या दिनांका पासुन पदोन्नतीच्या ठिकाणी ३० दिवसात हजर न झाल्यास पदोन्नतीची आवश्यकता नाही असे समजन्यात येवुन पदोन्नती हक्क राहणार नाही.

आदेशातील नमुद संबंधित कर्मचा-यांना त्यांच्या पदोन्नतीच्या ठिकाणी हजर होणे कामी कार्यालय प्रमुख यांनी स्थानिक पातळीवर पर्यायी व्यवस्था करुन त्वरीत कार्यमुक्त करणेत यावे. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल इकडेस तात्काळ सादर करावा.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्यांचा संकेतांक 202508221100221 असा आहे.

(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री. ---------------------------- आदेशातील नमुद सर्व कर्मचारी

प्रत व द्वारा :- वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र--------------- (संबंधित)

२/- सदरचे आदेश संबंधितांना बजावून पदोन्नतीचे ठिकाणी हजर होणेकामी तात्काळ कार्यमुक्त करणेत यावे.

प्रत :-मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) --------------- जिल्हा अहिल्यानगर

प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती (सर्व) --------------- जिल्हा अहिल्यानगर

(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर